# मंत्रिमंडळ निर्णय

२३ जून २०१५

( मंत्रिमंडळ बैठक क्र.३६ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | वाळू तस्करांना चाप लावण्यासाठी “एमपीडीए”त सुधारणा | महसूल |
| २ | जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार रोखण्यासाठी आता ‘एमपीडीए’नुसार कारवाई | अन्न व नागरी पुरवठा |
| ३ | वर्धा–यवतमाळ–पुसद–नांदेड रेल्वे मार्गासाठी एक हजार कोटी देण्यास मान्यता | परिवहन |
| ४ | मुक्ताईनगर येथे कृषी महाविद्यालय स्थापन्यास मान्यता | कृषी |

**वाळू तस्करांना चाप लावण्यासाठी**
**“एमपीडीए”त सुधारणा**

राज्यातील वाळू तस्करीला परिणामकारक आळा घालण्यासाठी “महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१”(एमपीडीए) नुसार यापुढे वाळू तस्करांवर कारवाई करण्यात येणार असून त्यादृष्टीने या अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

राज्यात अधिक वेगाने नागरीकरण होत असल्याने गृहनिर्माण, पायाभूत सुविधा तसेच इतर विकासकामांसाठी वाळूची गरज सतत वाढती आहे. त्यातून अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतूक करण्याचे प्रकार सुरु झाले आहेत. या प्रकारांमुळे बऱ्याचदा वैध मार्गाने वाळूचा लिलाव होऊ न देणे, लिलाव झाल्यास त्याला विविध मार्गाने आव्हान देऊन संघटितपणे वाळूचे अवैध उत्खनन करुन वाळूची तस्करी करण्यात येत असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच तस्करी रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर वाळू तस्करांकडून संघटितरित्या हल्ला करण्यासह त्यांच्या अंगावर वाहने घालून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न गेल्या काही वर्षात केला गेला आहे. त्यामुळे अधिनियमातील नावाच्या सुधारणेसह “वाळू तस्कर” आणि “वाळूची तस्करी” या दोन संज्ञांची व्याख्या करुन त्यांना कलम २ मध्ये अंतर्भूत करण्यात आले आहे. अधिनियमातील या सुधारणेमुळे संघटितपणे वाळूचे अवैध उत्खनन आणि या वाळूची बेकायदेशीररित्या वाहतूक करणे या प्रकारांना आळा घातला जाणार आहे. वाळू तस्करांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने कडक उपाययोजना करण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे. वाळू तस्करांना मदत करणाऱ्यांवरही या अधिनियमानुसार आता कारवाई केली जाणार आहे.

-----०-----

## जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार रोखण्यासाठी आता ‘एमपीडीए’नुसार कारवाई

जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्यांवर “महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१”(एमपीडीए) नुसार कठोर कारवाई करण्यासाठी या अधिनियमात सुधारणा करण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

या सुधारणेनुसार काळाबाजार करणाऱ्या व्यक्तींच्या व्याख्येचा समावेश “महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१” मध्ये करण्यात येणार आहे.

जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्यांसाठी पूर्वी असणारी ६ महिने स्थानबद्धतेची तरतूद या सुधारणेमुळे आता १वर्ष कालावधीसाठी करता येऊ शकेल. राज्यात ‘एमपीडीए’मध्ये सहा महिने स्थानबद्धतेची तरतूद आहे, ती आणखी सहा महिने जास्तीच्या कालावधीसाठी वाढविता येते .राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या काळाबाजाराची प्रकरणे मोठ्या प्रमाणावर उघडकीस आली आहेत .या प्रकारांना पायबंद घालण्यासाठी राज्यात जीवनाश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्तीस हा कायदा लागू करण्यात आला आहे.

-----o-----

परिवहन विभाग

## वर्धा-यवतमाळ-पुसद-नांदेड रेल्वे मार्गासाठी एक हजार कोटी देण्यास मान्यता

वर्धा-यवतमाळ-नांदेड नवीन रेल्वे मार्गाचा सुधारित खर्च २ हजार ५०१ कोटी ५० लाख रूपये असून त्यातील राज्य शासनाच्या ४० टक्के सहभागापोटी एक हजार कोटी ४२ लाख रूपयांचा निधी केंद्र शासनास टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पामुळे वर्धा ते यवतमाळ-पुसद-नांदेड असा थेट ब्रॉडगेज रेल्वे मार्ग उपलब्ध होणर असून या चार महत्त्वपूर्ण शहरांकरिता तसेच वर्धा, यवतमाळ, नांदेड जिल्ह्यांकरिता रेल्वे सुविधांचा विस्तार होणार आहे. हा मार्ग २८४ किलोमीटर अंतराचा असून सुमारे ३०.५ किलोमीटरवरील ११९ हेक्टर भूमी अधिग्रहण पूर्ण झाले आहे. तसेच नांदेड आणि यवतमाळ जिल्ह्यातील ९४५ हेक्टर भूमी अधिग्रहित करण्यात येत आहे. आतापर्यंत या प्रकल्पावर ९३ कोटी ७६ हजार रूपये खर्च झाला असून त्यापैकी ५० कोटी राज्य तर ४३ कोटी ७६ हजार रूपये रेल्वे मंत्रालयातर्फे खर्च करण्यात आले आहेत.

राज्याच्या ग्रामीण भागातील रेल्वे प्रकल्पांना गती मिळून ते प्रकल्प जलदगतीने पूर्ण व्हावे यासाठी काही महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये राज्याचा ४० ते ५० टक्के आर्थिक सहभाग देण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले आहे. त्यानुसार वर्धा-यवतमाळ-पुसद-नांदेड या नवीन रेल्वे मार्गासाठी ४० टक्के सहभागाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यात भूसंपादनाचा खर्च समाविष्ट करण्यात आला आहे.

-----o-----

## मुक्ताईनगर येथे कृषी महाविद्यालय स्थापन्यास मान्यता

जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथे कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यात शेती उत्पादनात जळगाव जिल्हा अग्रेसर असून या जिल्ह्यात केळी, बोर, सीताफळ, डाळींब, पेरू इत्यादी फळपिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. मात्र, या जिल्ह्यात कृषी महाविद्यालय नव्हते. जिल्ह्यातील मुक्ताईनगर या तालुक्याच्या ठिकाणी कृषी महाविद्यालय झाल्यास जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाची सोय उपलब्ध होऊन शेतीचा सर्वांगीण विकास करणे शक्य होणार असल्याने येथे कृषी महाविद्यालय स्थापन्याचा निर्णय घेण्यात आला. या महाविद्यालयात प्रतिवर्षी ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार असून ६४ शिक्षक आणि ३७ शिक्षकेतर अशा १०१ पदांना मान्यता देण्यात आली आहे. यासाठी ६५ कोटी ७० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

-----०-----